मा. जिल्हाधिकारी, पालघर यांच्या अध्यक्षतेखालील जिल्हा निर्यात प्रचालन समिती बैठक दि.१०.०७.२०२३ रोजी संपन्न् झालेल्या जिल्हा निर्यात प्रचालन समितीच्या बैठकीचे इतिवृत्त

---

दिनांक १०/०७/२०२३ रोजी दुपारी १२.०० वाजता पालघर जिल्हयासाठी निर्यात प्रचालन समिती बैठक मा. जिल्हाधिकारी कार्यालय, पालघर, जिल्हा पालघर येथे मा. जिल्हाधिकारी, पालघर यांचे अध्यक्षतेखाली घेण्यात आली होती. सदर बैठकीसाठी खालील प्रमाणे पदाधिकारी उपस्थित होते.

| क्र. | अधिकारी / सदस्य यांचे नांव | पदनाम |
|---|---|---|
| १ | Shri. Govind Maruti Bodake | Hon'ble Collector, Palghar |
| २ | Shri. Vikrant Patil | LDM, Palghar |
| ३ | Shri. Vinod Hegde | Agriculture Officer, Palghar |
| ४ | Shri. Sudhanshu Ashwin | Nabard Bank, Palghar |
| ५. | Shri. Dinesh Patil | Assistant Commissioner, Fisheries Dept., Palghar |
| ६ | Smt. Priyanka Mahapekar | Assistant Officer, Fisheries Dept., Palghar |
| ७ | Shri. Anil Kanse | DGFT, Mumbai |
| ८ | Shri. Swapnil Bobhate | EEPC, Mumbai |
| ९ | Shri.Pratap B. | EEPC, Mumbai |
| १० | Shri. Pranil Save | Chiku Cluster, Talasari |
| ११ | Shri. Sunil Akrekar | Fish Cluster, Vikramgad |
| १२ | Shri. Yadnesh Save | Chiku Exporter |
| १३ | Shri. Manish Deshmukh | Dandekar Collage, Palghar |
| १४ | Shri. Vivek Vartak | Khar Land Research Station, Panvel |
| १५ | Shri. Pranav Z. | EY Team |
| १६ | Shri. Velji Gogri | Chairman, TIMA, Boisar. |
| १७ | Shri. Narvekar | Achhad Inustrial Association, Talasari |
| १८ | Shri. Digivjay Pol | Manager, DIC, Palghar |
| १९ | Shri. Vickey Khirale | Manager, DIC, Palghar |
| २० | Smt. V.B. Sone | General Manager, District Inds. Centre, Palghar |

श्रीमती व्हि.बी. सोने, महाव्यवस्थापक, जिउके पालघर यांनी District Export Action Plan यांचे सविस्तर सादरीकरण करुन चर्चा करण्यात आली. पालघर जिल्ह्याकरीता ODOP अंतर्गत चिक्कू उत्पादन व Marine Products हे दोन असल्याबाबत सभेस सांगितले तसेच चिक्कू प्रक्रिया उद्योगांस चालना मिळणेसाठी राज्य शासनाच्या समूह विकास योजनेंतर्गत मौजे ब्राम्हणगांव, पोष्ट बोडीं ता. तलासरी जि. पालघर येथे व मरीन प्रोडक्ट्स उद्योगांस चालना मिळणेसाठी राज्य शासनाच्या समूह विकास योजनेंतर्गत ता. विक्रमगड, जिल्हा पालघर येथे सामायिक सुविधा केंद्र योजलेले असून या माध्यमातून उत्पादन व निर्यात वाढीसाठी प्रयत्न होणार असल्याने उद्योजकांनी या वस्तूचे उत्पादनासाठी पुढाकार घेण्याचे आवाहन केले. तसेच, सदर चिकू क्लस्टर जुलै महिनाअखेरीस उत्पादनक्षम होणार असल्याचे सदस्यांना अवगत केले. तसेच Sustainable Export Promotion साठी १० Points (Annexure-I) आणि ODOP and Export Promotions साठी चे ७ Points (Annexure-II) सविस्तरपणे सादर केले.

सदर बैठकीमध्ये ODOP awards साठी नामांकन भरणे बाबत मार्गदर्शन करण्यासाठी EY Team कडून आलेल्या श्री. प्रणव झुंझारराव यांनी नामांकन सादर करण्याची प्रक्रिया समजावून सांगितली. त्यानुसार मा. अध्यक्षांनी कृषी विभाग अधिकारी, पालघर आणि मत्स्य विभाग, पालघर यांना उपलब्ध माहिती पुराव्यासहीत जिल्हा उद्योग केंद्रास आणि EY Team यांना सादर करण्याचे व नामांकन भरण्यासाठी सहकार्य होणेकामी प्रतिनिधी निर्देशित करण्याचे सुचित केले.

मा. जिल्हाधिकारी, पालघर यांनी दिनांक १४.०२.२०२३ रोजीच्या जिल्हा निर्यात प्रचालन समिती मध्ये भाडे तत्वावरील रेल्वे स्टॉल आणि किसान रेल्वे या संदर्भात केलेल्या सुचनानुसार सविस्तर प्रस्ताव संबंधित कार्यालयास त्यानुसार दिनांक १३.०३.२०२३ रोजी अग्रेषित केले होते. तसेच किसान रेल्वे संदर्भात रेल्वे विभागाने त्यांच्या वरिष्ठ पातळीवर पत्रव्यवहार झालेला आहे. पुढिल कार्यवाहीची सविस्तर माहिती घेणेबाबत मा. अध्यक्षांनी सुचित केले.

पालघर जिल्ह्याच्या Export Action Plan वर झालेल्या चर्चेअंती पालघर जिल्ह्यातील सध्याचे निर्यातीतील प्रमाण बघता भविष्यात आणखीन वाढ शक्य आहे ते प्रमाण वाढवण्यासाठी DGFT आणि EEPC यांना प्रचालन कॅम्प आयोजित करण्याबाबत मा. अध्यक्षांनी निर्देशित केले होते त्यानुसार माहे ऑगस्ट मध्ये DGFT आणि EEPC यांनी प्रचालन कॅम्प आयोजित करणार असल्याचे मा. अध्यक्षांना सांगितले. तसेच, निर्यातदांराची यादी अद्ययावत करण्यासाठी नविन उपलब्ध निर्यातदारांची यादी जिल्हा उद्योग केंद्रास सादर करण्याचे आदेश दिले.

मा. जिल्हाधिकारी, पालघर यांनी औद्योगिक क्षेत्रासाठी मरीन प्रॉडक्टस व कृषी प्रक्रियेंतर्गत चिकू उत्पादन या एक जिल्हा एक उत्पादन या निवड करण्यांत आलेल्या वस्तूंचे उत्पादनासाठी जिल्हयामध्ये मोठया प्रमाणात वाव असल्यामुळे उद्योजक/ उत्पादक यांनी सदर वस्तूंचे उत्पादनासाठी औद्योगिक गुंतवणूकीचे माध्यमातून प्रयत्न करुन या वस्तूंची जास्तीत जास्त निर्यातीवाढीसाठी प्रयत्न करण्यांचे आवाहन सर्व उपस्थित उद्योजक/ निर्यातदार व औद्योगिक संघटना यांना केले. मा. वृषाली सोने यांनी निर्यात प्रचालन आणि गुणवत्ता वृध्दी साठी दांडेकर कॉलेज, पालघर आणि खार भुमी संशोधन संस्था, पनवेल यांच्यासोबत सामजंस्य करार (MoU) केले असून त्यानुसार श्री. मनीष देशमुख, दांडेकर कॉलेज यांनी विद्यार्थ्यांना निर्यातीसंबंधीत मार्गदर्शनासाठी वार्षिक प्रकल्प, सर्व्हे, प्रोजेक्ट्स, नाविन्यपूर्ण कल्पना व निर्यातीतील संधी याबाबत शिबिर आयोजित करणार असल्याचे अध्यक्षांना सांगितले. तसेच, डॉ. विवेक वर्तक, खार भुमी संशोधन संस्था, पनवेल यांनी मत्स्य उत्पादनातील निर्यात

संधी व विविध मत्स्य उत्पादने याचे प्रशिक्षण पालघर जिल्ह्यात MCED संस्थेसोबत मिळून आयोजित करणार असल्याचे अध्यक्षांना कळविले.

तसेच, श्री. विनोद हेगडे, कृषी अधिकारी यांनी ODOP Award संदर्भात, उपलब्ध असलेली सर्व माहिती देण्याचे आश्वासन दिले आणि चिक्कू उत्पादन उद्योगातील गुंतलेल्या विक्रेते आणि खरेदीदार यांची एक सामायिक बैठक लवकरात लवकर आयोजित करणार असल्याचे मा. अध्यक्षांना सांगितले.

शेवटी श्रीमती व्हि.बी. सोने, महाव्यवस्थापक, जिउके पालघर यांनी सदरची बैठक संपन्न झाल्याचे जाहिर केले.

सोबत- १. Sustainable Export Promotion, १० Points (Annexure-I)

२. ODOP and Export Promotions, ७ Points (Annexure-II)

महाव्यवस्थापक, जिउकें पालघर
तथा
सदस्य सचिव, जिल्हा निर्यात प्रचालन समिती

मा. जिल्हाधिकारी, पालघर.
तथा
मा. अध्यक्ष जिल्हा निर्यात प्रचालन समिती

G:\desktop\DEPC-10-07-2023= Export.doc